# प्रथम भाषा : मराठी – इयत्ता : तिसरी

ज्ञानसेवा तु साफल्यम्

## महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.

### प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

### शैक्षणिक प्रगती चाचणी : संकलित मूल्यमापन २ : २०१७–१८

### इयत्ता : तिसरी – विषय : मराठी (लेखी)

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________ **हजेरी क्रमांक :** ☐

**शाळेचे नाव :** ______________________ **तुकडी :** ________

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **दिनांक :**   /   /२०१८

| | लेखी | | | | | | तोंडी | | प्राप्त गुण | | | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | मूलभूत क्षमता प्रश्न क्र. १ व ७ | इयत्तेच्या क्षमता | एकूण | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | १० | ३० | ४० | |

**प्र. १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________

**प्र. २.** खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

गुरुजी त्याचे बोलणे शांतपणे ऐकत होते; परंतु गुरुजी पप्पूला थोडेसुद्धा रागावले नाहीत. मुलांना नवल वाटले. त्यांनी पप्पूला जवळ बोलावले. त्याची प्रेमाने विचारपूस केली व म्हणाले, ''चुका होत असतात; पण त्या प्रामाणिकपणे कबूल करायला धैर्य लागतं. ते तू दाखवलं आहेस. पप्पू, तुझं चालताना लक्ष नव्हतं, म्हणून तुझा पाय रोपावर पडला. शेंडा तुटला. तुझ्याकडून नकळत चूक झाली आणि तू कबूलही केलीस. हे ऐकून बरं वाटलं मला. रोप लहानाचं मोठं होईपर्यंत खूप काळजी घ्यावी लागते, तेव्हा ते मोठं होतं. तुमची आईसुद्धा तुम्ही लहानाचे मोठे होईपर्यंत तुमची खूप काळजी घेते बरं! उद्या शाळेत येताना मी दोन रोपं आणणार आहे. त्यांना वाढवण्याची जबाबदारी पप्पू तुझी!

**अ)** रोपं कोण आणणार होते? योग्य पर्यायाच्या क्रमांकास गोल कर. (गुण १)

१) पप्पू  २) गुरुजी  ३) आई

**ब)** मुलांना कशाचे नवल वाटले? (गुण २)

______________________________

______________________________

______________________________

**क)** पप्पूकडून नकळत कोणती चूक झाली? त्याने ती कबूल केली का? (गुण २)

______________________________

______________________________

______________________________

**प्र. ३.** खालील चित्रात दामू काका ओला कचरा व सुका कचरा गोळा करीत आहेत. त्यांच्या **कामाबाबत** पाच वेगवेगळे प्रश्न विचार आणि ते खालील जागी लिही. (गुण ५)



**प्र. ४.** खालील बातमी मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुटरे येथे 'बालिका दिन' उत्साहात साजरा**

चिपळूण, ता. ४ जानेवारी – नुकत्याच काल पार पडलेल्या ''चला व्यक्त होऊ या'' या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुटरे येथे सावित्रीबाई फुले जन्मदिवस 'बालिका दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व मुले-मुली, शिक्षक, ग्रामस्थ, महिला मंडळे उपस्थित होती. मुलींनी सावित्रीबाईंची वेशभूषा करून भाषणे केली. शाळेतल्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित सुंदर नाटिका सादर केली. सावित्रीबाईंनी मुलींच्या शिक्षणासाठी केलेल्या महान कार्याची माहिती शिक्षकांनी आपल्या भाषणातून दिली.

उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**अ)** मुलींच्या शिक्षणासाठी महान कार्य कोणी केले? (गुण १)

______________________________

______________________________

**ब)** 'बालिका दिन' कोणत्या तारखेस पार पडला? कार्यक्रमास कोण कोण उपस्थित होते? (गुण २)

______________________________

______________________________

**क)** बालिका दिनी कोणकोणते कार्यक्रम घेण्यात आले? (गुण २)

______________________________

______________________________

______________________________

**प्र. ५.** खालील चित्र पाहा आणि त्यावर आधारित गोष्ट लिही. (गुण ५)



**प्र. ६.** खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.

**अ)** 'कार' हा प्रत्यय जोडून शब्द लिही. (गुण १)

जसे - चित्र - चित्रकार

संगीत - ______________________

नाटक - ______________________

**ब)** खालील वाक्यात ज्या शब्दाखाली रेघ मारली आहे. त्या शब्दाला पर्यायी शब्द वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

मला जायचा रस्ता माहीत आहे.

______________________________________________

**क)** रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिही. (गुण १)

(टकटक, घणघण, टणटण)

चंदूने दारावर ______________ केली.

**ड)** खालील शब्दांतील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार कर. (गुण १)

जसे : बासमती - सम, मती, तीस, बाम

शिखरावर - ________________ ________________

**इ)** खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

खारूताई होती चपळ सारखी तिची पळापळ

______________________________________________

■■■